
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें.
विषय ८११-दी.
दा. क्र. ३२८६

# बाल पंचतंत्र ४



BVBK-0403276
BVBK-0403276

प. म. ०१०, वा ... ११७ज्ञ साका.
ग्रंस
क्र ३२०६ ता. २०।३।१९७०
व ७१ ·७१·

# बाल पंचतंत्र

## भाग चौथा

लेखक
त्र्यंबक पुरुषोत्तम थोरात

BVBK-0403276

BVBK-0403276

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

किंमत ३ रुपये

बाल पंचतंत्र

# निवेदन

ज्ञानदान करण्याचे वाङ्मयाचे जे अनेक प्रकार आहेत त्यांत 'कथा किंवा गोष्ट' ह्या प्रकाराला फार वरचे स्थान दिले जाते. हा प्रकार प्राचीन काळापासून आपल्या देशात रूढ आहे. उपनिषदांसारख्या वेदान्दपर ग्रंथांतील गहन तत्त्वे सुलभ रीतीने समजावून देण्यास प्राचीन ऋषींनी गोष्टींचाच आश्रय केलेला आढळतो. महाभारतकारांनीसुद्धा दृष्टान्तांकरता अनेक सुंदर कथा सांगितलेल्या आहेत. बुद्ध, महावीर, ख्रिस्त, महंमद ह्यांसारख्या महान धर्मप्रवर्तकांनी गोष्टींच्याच साह्याने आपला उपदेश लोकांच्या मनात ठसविला ह्याची साक्ष त्यांचे ग्रंथच देतात.

बालवाङ्मयात तर गोष्टीला अग्रस्थानच देण्यात आले आहे. कल्पित कथांची मुलांना अत्यंत आवड असते. ह्यामुळे त्यांच्या साह्याने एखादा उपदेश किंवा नीतितत्त्व बालमनावर मनोरंजक रीतीने सहज बिंबविता येते.

संस्कृत वाङ्मयात हितोपदेश व पंचतंत्र हे दोन कथाग्रंथ अत्यंत लोकप्रिय झालेले आहेत. दोन्ही ग्रंथांची रचना एकाच पद्धतीची आहे. एक मोठी कथा घेऊन तीत अनुषंगाने अनेक उपकथा सांगून मूळ तत्त्वाचे स्पष्टीकरण करावयाचे, ही ती पद्धती होय. स्पष्टीकरण करताना ग्रंथकर्त्यांनी अनेक सुभाषिते व व्यवहारांतील नीतितत्त्वे ह्यांचा संग्रह केला. त्यामुळे सदर ग्रंथ अबालवृद्धांस व्यवहारज्ञान शिकविण्यास समर्थ झाले आहेत.

तथापि लहान मुलांच्या मनोधर्माचा विचार केल्यास, त्यांना अवांतर उपदेशापेक्षा सरळ लिहिलेली मूळ कथाच जास्त आकर्षक वाटते. ही मनोवृत्ती लक्षात घेऊन मी पंचतंत्रातील अन्यत्र प्रसिद्ध न झालेल्या अशा काही सुंदर गोष्टी निवडून त्या पाच भागांत लिहिल्या आहेत. त्यांची भाषा शक्य तितकी सुबोध ठेवली असून प्रसंगानुरूप चित्रेही दिली आहेत.

त्र्यं. पु. थोरात

© केशव भिकाजी ढवळे

पुनर्मुद्रण एप्रिल १९९५

लेझर टाइपसेटिंग दि विझिविग, श्रीसमर्थ सदन, गिरगाव, मुंबई ४

| मुद्रक | प्रकाशक |
|---|---|
| स. ग. परुळकर | ज्योती धनंजय ढवळे |
| जस्मिन आर्ट | केशव भिकाजी ढवळे |
| वडाळा उद्योग भवन | पहिली भटवाडी |
| वडाळा, मुंबई ३१ | गिरगाव, मुंबई ४ |

# स्वच्छंदी उंट

गोष्ट पहिली


एका गावात एक सुतार राहात असे. त्याला सुतारकाम येत नसल्यामुळे पोट भरण्याचे साधन म्हणून त्याने एक उंटीण विकत घेतली. काही दिवसांनी तिला एक पोर झाले. त्या गावाभोवती झाडी खूप असल्यामुळे त्यांना खाण्यापिण्याला काही कमी नव्हते. त्यामुळे थोड्याच दिवसांत ती दोघे चांगली धष्टपुष्ट झाली आणि उंटिणीच्या दुधावर सुताराचा निर्वाह चांगला होऊ लागला. त्या पिल्लावर त्याचे फार प्रेम बसल्यामुळे त्याने मोठ्या कौतुकाने त्याच्या गळ्यात एक घंटा बांधली होती.

पुढे उंटांचा व्यापार करण्याचे ठरवून त्याने आणखी काही उंट खरेदी केले. चारापाणी मुबलक असल्यामुळे त्याचे उंट तयार व देखणे दिसत. यामुळे थोड्याच दिवसांत त्याचा चांगला जम बसला व व्यापारात त्याला चांगलाच पैसा मिळू लागला.

त्याचे सर्व उंट गावाबाहेरील बागांत चरावयास जात. तेथे मनमुराद पाला खाऊन व पाणी पिऊन संध्याकाळी एकत्र जमून घरी परत येत असत. तो

छोटा उंटही आता मोठा झाल्यामुळे त्यांच्याबरोबर चरावयास जात असे; परंतु तो रोज कळप सोडून मागे राही व सावकाश रमत गमत घरी येई. असे करण्याने तो एखाद्या दिवशी संकटात सापडेल, अशी भीती वाटून त्या उंटांनी त्या पोरास समजावण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; परंतु त्याने तिकडे लक्ष दिले नाही व आपला क्रम तसाच चालविला.

एके दिवशी त्याच्या गळयातील घंटेचा नाद ऐकून एक सिंह खरोखरच त्या बागेजवळ आला. त्याची चाहूल लागताच इतर सर्व उंट आपले चरणे आटोपून ताबडतोब घरी परतले. त्यांनी येताना त्या पोरालाही सूचना दिली; पण तो त्यांच्याबरोबर गेला नाही. उलट त्या दिवशी त्याने अधिकच उशीर केला.



अंधार पडला तेव्हा स्वारी घराकडे वळली; परंतु अंधारात त्याला वाट सापडेना. त्याच्या गळ्यातील घंटा वाजत असल्यामुळे त्या सिंहाला मात्र तो कोठे आहे हे कळून येत होते. त्याच्या वाटेवर तो दबा धरून बसला व उंट जवळ येताच त्याच्यावर झडप घालून त्याने त्याला ठार केले. त्याने शहाण्यांचा उपदेश ऐकला असता तर?

बाल पंचतंत्र : ४

गोष्ट दुसरी

# धूर्त कोल्हा

एकदा एका अरण्यात एक हत्ती मरून पडलेला एका कोल्ह्याला दिसला. त्याचे मांस खाण्याकरता तो प्रयत्न करू लागला, पण हत्तीचे कातडे कठीण असल्यामुळे त्याला ते तुटेना. इतक्यात् तेथे एक सिंह आला. त्याला पाहाताच कोल्हा त्यास साष्टांग नमस्कार घालून म्हणाला, 'महाराज, आपल्यासाठीच मी ह्या हत्तीची इतका वेळ राखण करीत बसलो होतो. आता आपण ह्यास खावे.'

सिंह म्हणाला, 'दुसऱ्याने मारलेला प्राणी मी कधी खात नसतो. तेव्हा हा हत्ती मी तुलाच बक्षीस देतो. तो तू खुशाल खा.'

कोल्हा म्हणाला, 'थोर लोक आपले ब्रीद कधीही सोडीत नाहीत. आपले हे वर्तन आपल्या मोठेपणाला साजेसेच आहे.'

नंतर सिंह निघून गेला. थोड्याच वेळाने तेथे एक वाघ आला. कोल्हा मनात म्हणाला, 'एक संकट टळले तो दुसरे आले. आता काहीतरी युक्ती करून याला वाटेला लावले पाहिजे.' मग तो वाघापुढे उभा राहून म्हणाला, 'वाघोबा, हा हत्ती आत्ताच एका सिंहाने मारला व त्याच्यावर मला पाहारा करण्यास ठेवून तो आंघोळीला गेला आहे. जातांना त्याने मला बजावले आहे की, जर येथे वाघ आला तर त्याला सांग की, मी मारलेला हत्ती वाघाने उष्टा केला, तर ह्या रानातील सगळे वाघ मारून मी त्याचा सूड घेईन.' हे ऐकताच वाघाची घाबरगुंडी उडाली आणि तो तेथून झपाट्याने निघून गेला.

वाघाच्या मागून तेथे एक वानर आला. त्याच्या दाढा मजबूत होत्या म्हणून कोल्हा युक्तीने त्याला म्हणाला, 'वानरदादा, आज तू फार भुकेलेला दिसतोस. हा पाहा सिंहाने हत्ती मारून टाकला आहे. मलाच पाहाऱ्याकरता ठेवले आहे. तेव्हा मीच तुला परवानगी देतो की, सिंह आला नाही तोवर तू हत्तीचे थोडेसे मांस खाऊन भूक खुशाल शांत कर.'



वानर म्हणाला, 'नको रे बाबा! या भानगडीत जीव धोक्यात घालण्यास मला सांगू नको.'

कोल्हा म्हणाला, 'असा भितोस काय? तू खुशाल मांस खात बैस. मी दूर जाऊन सिंहाच्या वाटेवर उभा राहातो व तो दिसला की लगेच तुला सांगतो; म्हणजे तुला पळून जाण्यास वेळ सापडेल.'

त्याप्रमाणे वानर हत्तीचे कातडे उकलू लागला. कोल्हा दूर जाऊन त्याच्याकडे पाहात राहिला. कातड्याचा तुकडा निघालेला पाहाताच कोल्हा घाईने म्हणाला, 'वानरदादा, जा लवकर पळ, तो पाहा सिंह आला.' ते ऐकताच वानर तेथून निघून गेला. त्याने आयतेच कातडे फाडून ठेवले होते. तेथून कोल्होबा मांस खाऊ लागले. इतक्यात् तेथे दुसरा एक कोल्हा आला; पण त्याच्याशी युद्ध करून ह्याने त्याला पिटाळून लावले. नंतर त्याने एकट्याने ते मांस स्वस्थपणे खाल्ले. ते त्याला अनेक दिवस पुरले.

गोष्ट तिसरी

# अविचाराचा परिणाम

एका गावात एका ब्राह्मणाच्या बायकोने एक मुंगुसाचे पिल्लू बाळगले होते. त्या बाईला एक लहान मूलही होते. ती त्या मुंगुसाच्या पिलाचे मुलाप्रमाणे प्रेमाने लालन पालन करीत असे. त्यामुळे ते पिल्लू अगदी निर्धास्तपणे घरात इकडे तिकडे वावरत असे. मुंगुसाच्या भीतीने त्या घरात सापकिरडू वगैरे कधी फिरकत नसे.

एकदा ती बाई मुलाला पाळण्यात निजवून पाणी आणण्याकरता नदीवर गेली. जाताना तिने आपल्या नवऱ्याला मुलाकडे लक्ष ठेवण्यास सांगितले; परंतु ते लक्षात न राहून ब्राह्मण नेहमीप्रमाणे बाहेर गेला.

दरम्यानच्या वेळात एका बिळातून एक मोठा साप बाहेर आला व त्या मुलाच्या पाळण्याकडे जाऊ लागला. सापाला पाहाताच मुंगूस त्याच्यावर तुटून पडले व त्याच्याशी भयंकर झटापट करून त्याने त्याची खांडोळी केली, त्यामुळे त्याचे तोंड रक्ताने भरले. आपला पराक्रम आपल्या धनीणीस दाखवावा म्हणूनच की काय, ते मुंगूस दाराशी बसून राहिले.



लवकरच ती बाई डोक्यावर पाण्याची घागर घेऊन परत आली. मुंगुसाचे तोंड रक्ताने भरलेले पाहाताच याने खचित आपल्याच मुलाचा प्राण घेतला असला पाहिजे, असा विचार तिच्या मनात आला. त्यामुळे तिला इतके दुःख झाले की, जास्त विचार न करता तिने डोक्यावरील घागर त्या मुंगुसाच्या अंगावर टाकली. त्याबरोबर बिचारे इमानी मुंगूस मरून गेले!

नंतर बाई रडत रडत मुलाच्या पाळण्याजवळ गेली. पाहाते तो मूल स्वस्थ निजले असून त्याला कसलीही इजा झालेली नाही. इतक्यात् तिची नजर सापाच्या खांडोळ्यांवर गेली. त्याबरोबर खरा प्रकार तिच्या ध्यानात आला.

साप मुलाला चावला असता; परंतु त्यालाच ठार मारून मुंगुसाने मुलाचा जीव वाचवला होता. असे

असताना मी त्याच्याविषयी भलतीच शंका घेतली आणि अधिक विचारही न करता उतावीळपणाने त्याचा प्राण घेतला! रागाच्या भरात मी हा केवढा अविचार केला! किती गुणी व इमानी मुंगूस! किती मी दुष्ट! इत्यादि विचार तिच्या मनात येऊन तिला अतिशय पश्चात्ताप झाला.

बाल पंचतंत्र : ४

गोष्ट चौथी

# चक्रं भ्रमति मस्तके

एका गावात चार ब्राह्मणांचे चार मुलगे राहात होते. त्यांची एकमेकांशी अगदी जिवलग मैत्री होती; परंतु ते चौघेही अगदी दरिद्री होते.

एके दिवशी आपल्या दारिद्र्याला कंटाळून पैसा मिळविण्याकरता ते चौघेही देशांतरास जाण्यास निघाले. काही दिवसांनी ते अवंती नगरात पोचले. तेथे नदीवर स्नान करून त्यांनी महाकालेश्वराचे दर्शन घेतले. तेथेच त्यांना भैरवानंद नावाचा एक योगी भेटला. त्याला भक्तिपूर्वक नमस्कार करून ते त्याच्याबरोबर त्याच्या मठात गेले. योग्याने विचारल्यावर ते म्हणाले, 'महाराज काही तरी विलक्षण सिद्धी प्राप्त करून घेऊन पुष्कळ द्रव्य मिळवावे अशी आमची इच्छा

आहे. तेव्हा ज्याच्या योगाने मुबलक धन मिळेल असा एखादा उपाय आपण आम्हाला सांगावा. त्याकरता कितीही कष्ट सोसावे लागले तरी ते सोसण्यास आम्ही तयार आहोत.'

त्यांचा तो दृढनिश्चय पाहून त्या योग्याने प्रत्येकाला एक एक काठी दिली आणि सांगितले, 'ही काठी इच्छित हेतू प्राप्त करून देण्याच्या कामी रामबाण आहे. प्रत्येकाने ही आपल्या हातात घेऊन जावे. ज्याची काठी ज्या ठिकाणी पडेल त्या ठिकाणी त्याला जमिनीत धनाचा ठेवा सापडेल.'

योग्याच्या सांगण्याप्रमाणे चौघेही हातात काठ्या घेऊन पुढे प्रवास करू लागले. जाता जाता त्यांच्यापैकी एकाच्या हातातील काठी खाली पडली. लगेच त्याने तेथे खणून पाहिले, तो त्यास तेथे तांब्याची खाण लागली. तेव्हा तो आपल्या सोबत्यांस म्हणाला, 'आता पुढे जाऊ नये. ह्या खाणीतील तांब्यापासून आपणास पुष्कळ पैसा कमाविता येईल.' परंतु इतर तिघांस त्याचे म्हणणे पटले नाही व ते तिघेच पुढे निघाले.

थोडे चालून जातात तो दुसऱ्याच्या हातातील काठी खाली पडली. त्याने तेथे खणून पाहिले तो त्याला रुप्याची खाण लागली. तो मोठ्या आनंदाने आपल्या दोघा सोबत्यांस म्हणाला, 'मित्रांनो, आपणास

आता पुढे जाण्याचे कारण नाही. येथील रुप्याच्या व्यापाराने आपण हवे तितके श्रीमंत होऊ शकू.'

त्यावर त्याचे दोघे सोबती म्हणाले, 'अरे आता पुढे खात्रीने सोन्याची खाण लागणार! म्हणून आम्ही आपले पुढे जाणार. तू येत नसलास तर आम्ही आग्रह करीत नाही.' असे म्हणून ते दोघेही पुढे चालू लागले.

काही वेळाने एकाच्या हातातील काठी खाली पडली. त्याने तेथे खणले तो खरोखरच सोन्याची खाण लागली. तेव्हा त्याने आपल्या मित्रास म्हटले, 'मित्रा, सोन्याइतकी मौल्यवान वस्तू कोणतीही नाही. आपली इच्छा पूर्ण होईल इतके द्रव्य आपणास ह्या खाणीपासून मिळेल. तेव्हा जास्त हाव न धरणे बरे; कारण अती तेथे माती.'

त्याच्या सोबत्याला अधिक हाव सुटली.

तो म्हणाला, 'अरे आता यापुढे आपल्याला खास रत्नांची खाण लागेल. रत्नांपुढे सोन्याची काय किंमत आहे? तू येत नसलास तरी मी आपला पुढे जाणार!' असे म्हणून तो एकटाच पुढे निघाला.

बराच प्रवास केल्यावर तो थकला. वरून सूर्याचे ऊन अंग भाजीत होते व खालून जमीन तापल्यामुळे पायाला चटके बसत होते. अशा स्थितीत बिचारा

तहानेमुळे पाण्यासाठी इकडे तिकडे भटकू लागला. भटकता भटकता त्याला एक पुरुष दिसला.



त्याच्या डोक्यावर एक चाक वाटोळे फिरत होते व त्याचे सर्व अंग रक्ताने भरले होते. ते पाहून त्याला मोठे नवल वाटले. तो त्या मनुष्याजवळ गेला व त्याने त्याला विचारले, 'तू कोण आहेस? तुझी अशी स्थिती कशाने झाली? तुझ्या डोक्यावर हे चाक कसले फिरत आहे?' असे तो बोलत आहे तो ते चाक त्याच्याच डोक्यावर येऊन चिकटले. त्याबरोबर त्याची अगदी गाळण उडून गेली. तो दुःखाने त्या पुरुषाला म्हणाला, 'हे चाक माझ्या डोक्यावर येऊन कसे चिकटले? या यातनांतून माझी सुटका कोण करील?'

तेव्हा तो पुरुष म्हणाला, 'बाबा रे, तुझ्यासारखाच सिद्धी प्राप्त झालेला दुसरा मनुष्य हातात काठी घेऊन येथे येईल व तुझ्याशी बोलेल तेव्हा हे चाक आपोआप त्याच्या डोक्यावर जाऊन चिकटेल. कुबेराने आपल्या संपत्तीचे रक्षण व्हावे म्हणून हे संकट उत्पन्न करून ठेवले आहे. आता मी जातो.' असे म्हणून तो पुरुष निघून गेला आणि चक्रधर आपल्या अतिलोभाचे फळ भोगीत तेथेच राहिला.

बाल पंचतंत्र : ४

गोष्ट पाचवी

## गाढव व कोल्हा

ज्याला स्वतःला व्यवहारज्ञान नाही त्याने मित्राचा सल्ला तरी ऐकावा. तो न ऐकला तर कशी फजिती होते, ते पुढील गोष्टीत पाहा.

एका परटाचे एक गाढव होते. त्याच्याकडून दिवसभर काम करून घेऊन परीट त्याला रात्री मोकळे सोडी. मग ते वाटेल तिकडे हिंडून आपले पोट भरी व उजाडण्याच्या सुमारास घरी परत येई. त्या गाढवाची एका कोल्ह्याशी मैत्री जमली. शेतात मनमुराद खावयास

मिळत असल्यामुळे ते दोघे चांगले गुटगुटीत झाले होते. कोल्हा बहुतेक त्याच्याबरोबरच असे.

असेच एकदा ते एका मळ्यात शिरून काकड्या खात असताना गाढवाच्या डोक्यात गाण्याची लहर आली व ते कोल्ह्याला म्हणाले, 'मित्रा, आज मला गावेसे वाटत आहे! कोणता राग गाऊ सांग!'

कोल्हा म्हणाला, 'मामा, भलत्याच फंदात पडू नका. चोरी करणाराने तोंडाला कुलूप घातले पाहिजे. ज्याला आपल्या जिभेवर दाब ठेवता येत नाही त्याने चोरीच्या भानगडीत पडू नये. त्यातून तुमचा आवाज पडला पहाडी. तो ऐकून मळ्याचे रखवालदार जागे होतील व आपणा दोघांनाही ठार करतील. तेव्हा तुम्ही हा विचार सोडून द्या. पोटभर काकड्या खाऊन मुकाट्याने जाऊ या कसे!'

गाढव म्हणाला, 'मूर्खा, तू नेहमी रानात राहाणारा. तुला गायनशास्त्राची काय माहिती आहे? म्हणूनच अशा या चांदण्यात गाण्याची काय बहार आहे हे तुला कळत नाही.'

कोल्ह्याने विचार केला की, 'हा बोलून चालून गाढव. ह्याच्याशी हुज्जत घालण्यात अर्थ नाही. तेव्हा आपण आपल्या बचावाची युक्ती योजून ठेवावी हे चांगले.'

मग तो गाढवाला म्हणाला, 'मामा, मला गायनशास्त्राची फारशी माहिती नाही म्हणूनच मला त्याची गोडी कळत नाही. तेव्हा मी जरा दूर उभा राहून राखणवाले इकडे येतात की काय ते पाहातो. इकडे आपण आपले मधुर गाणे खुशाल सुरू करा.'



असे सांगून कोल्हा दूर जाऊन उभा राहिला. गाढवबोवाचे गायन सुरू होताच रखवालदार सोटा घेऊन धावत आला व त्याने गाढवाला मरेमरेतो मारून एका उखळीशी बांधून ठेवले.

समाप्त

BVBK-0403276



३२७६